# मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी (सुधारणा) अॅक्ट, २०२१

CommonHealth

## प्रस्तावना

भारतात काही अटींनुसार गर्भपात करणे कायदेशीर आहे. १९७१मध्ये, भारत सरकारने मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी अॅक्ट, १९७१ (एमटीपी कायदा) पास केला. १९७१ पर्यंत, गर्भधारणा समाप्ती किंवा गर्भपात भारतीय दंड संहितेनुसार कलम ३१२ अंतर्गत दंडनीय फौजदारी गुन्हा होता. १९६४ मध्ये, लोकसंख्या वाढ, माता मृत्यू आणि असुरक्षित गर्भपाताच्या घटनांच्या वाढीला प्रतिसाद म्हणून, भारत सरकारने गर्भपाताच्या सामाजिक–सांस्कृतिक, कायदेशीर आणि वैद्यकीय पैलूंचा आढावा घेण्यासाठी शांतीलाल शाह समिती ची स्थापना केली होती. समितीच्या अहवालामध्ये विशिष्ट अटींखाली गर्भपात कायदेशीर करण्यात यावा, असे प्रस्तावित केले होते. या अहवालाच्या शिफारशींनी एमटीपी कायद्याचा आकार घेतला. या कायद्यात तीन वेळा सुधारणा करण्यात आली आहे, २००२, २००३ आणि अलीकडे २०२१ मध्ये. एमटीपी कायद्याअंतर्गत काही विशिष्ट तरतुदी आहेत (खाली दिल्या आहेत) आणि याचे उल्लंघन करणे कलम ३१२ अंतर्गत दंडनीय गुन्हा मानले जाते ज्यात २ ते ७ वर्ष कठोर कारावासाची शिक्षा आहे.

## गर्भ समाप्तीसाठी चे/गर्भपात करण्याचे संकेत:

गर्भधारणा खालील अटींमुळे संपुष्टात आणता येऊ शकते:

- गर्भधारणा पुढे नेल्यास गर्भवती महिलेच्या जीवाला किंवा आरोग्याला धोका असल्यास;
- बलात्कारामुळे गर्भधारणा झाली असल्यास;
- गर्भनिरोधक अप्रभावी झाल्याने गर्भधारणा झाली असल्यास;
- जन्माला आलेले मूल शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या अपंग असण्याचा मोठा धोका असल्यास

## कायदेशीर समाप्तीसाठी/गर्भपता साठी गर्भधारणेचा कालावधी:

२०२१ च्या सुधारणेनुसार, गर्भधारणेनंतर २४ आठवड्यांपर्यंत गर्भपात करता येऊ शकतो

- गर्भधारणेचा कालावधी २० आठवड्यांपेक्षा कमी असल्यास १ नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीच्या मतानुसार
- गर्भधारणेचा कालावधी २०–२४ आठवड्यांच्या दरम्यान असल्यास २ नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांच्या मतानुसार

तथापि, २० ते २४ आठवड्यांपर्यंतची गर्भधारणेची मर्यादा या प्रयोजनासाठी तयार केलेल्या नियमांनुसार महिलांच्या काही विशिष्ट गटासाठी लागू होईल. गर्भाच्या गंभीर विकृतींच्या बाबतीत, राज्य वैद्यकीय मंडळाच्या शिफारशींच्या आधारे २४ आठवड्यांनंतरही गर्भधारणा समाप्त केली जाऊ शकते.

- **वैद्यकीय मंडळ:**

प्रत्येक राज्य सरकार किंवा केंद्रशासित प्रदेशाला, अधिकृत राजपत्रातील (गॅझेट) अधिसूचनेद्वारे स्त्रीरोगतज्ज्ञांसह बालरोगतज्ञ, रेडिओलॉजिस्ट किंवा सोनोलॉजिस्ट आणि शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे इतर कोणतेही सदस्य यांचे एक वैद्यकीय मंडळ स्थापन करावे लागेल.

- **सेवा प्रदाते:**

गर्भपात फक्त नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीक (चइइड/ऍलोपॅथ) ज्यांना स्त्रीरोगशास्त्र किंवा प्रसूतीशास्त्रात अनुभव किंवा प्रशिक्षण आहे त्यांच्याद्वारे निर्धारित नियमांनुसार केला जाऊ शकतो .

- **गर्भ समाप्तीसाठीची जागा:**

प्राथमिक आरोग्य केंद्र आणि त्यांच्या वरील स्थरावरची सरकारी केंद्रे गर्भपात सेवा तरतुदीसाठी आपोआप मंजूर होतात. खाजगी क्षेत्रात, खालील केंद्रांवर गर्भपात करता येतो

- आपत्कालीन परिस्थिती वगळता शासनाने स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समितीद्वारे स्थापित किंवा मंजुर केलेली केंद्रे
- ऑपरेशन टेबल, वैद्यकीय साधने ,भूल देण्यासाठीची , पुनरुत्थानाची आणि निर्जंतुकीकरणाची उपकरणे आणि आपत्कालीन वापरासाठी औषधे आणि इंट्रा–व्हेनस (नसेतून देण्याची) द्रव्यांसह सुसज्ज केंद्रे

कोणताही मंजूर प्रदाता कोणत्याही सुविधा/क्लिनिकमध्ये मेडिकल अबॉर्शनच्या (च–) गोळ्या वापरून गर्भपाताची सेवा देऊ शकतो. जर क्लिष्टता अथवा पेच (लोश्रिळलरींळेपी) निर्माण झाल्यास, मान्यताप्राप्त केंद्राच्या मालकाकडून त्या केंद्राची संमती असेल तर आणि त्या संमतीचे प्रमाणपत्र ठळकपणे प्रदर्शित केले असल्यास.

- **कायद्यांतर्गत महिलांचे हक्क:**

गर्भ समाप्ती/गर्भपात मध्ये खालील बाबी समाविष्ट आहेत :

- महिलेची संमती आवश्यक आहे, जर तीचे वय १८ वर्षापेक्षा कमी आहे किंवा तिला कुठला मानसिक आजार ,आहे तिला मानसिक विकारासाठी उपचारांची गरज आहे, अशा परिस्थितीत कायदेशीर पालनकर्त्यांची (श्रशसरश्र सींरीवळरप) संमती आवश्यक आहे. स्त्री प्रौढ असल्यास पती किंवा कुटुंबातील इतर सदस्यांच्या स्वाक्षरीची कायद्याने आवश्यकता नाही.
- गोपनीयतेचे आश्वासन– गर्भपात करवून घेत असलेल्या महिलेचे वैयक्तिक तपशील उघड केले जाणार नाहीत.

२०२१ ची सुधारणा स्पष्ट करते की कोणताही नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीक महिलेचा या कायद्याअंतर्गत गर्भपात केला गेला असल्यास त्या महिलेचे नाव आणि इतर तपशील त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे अधिकृत असलेल्या व्यक्ती वगळता इतर व्यक्तींसमोर उघड करणार नाही. या तरतुदींचे कोणतेही उल्लंघन केल्यास एक वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होऊ शकते.

## गर्भपाताच्या पद्धती:

- वैद्यकीय: गर्भधारणेच्या ७ आठवडे किंवा ४९ दिवसांपर्यंत परवानगी. मिफेप्रिस्टोनच्या २०० मिलीग्रामच्या १ टॅब्लेट तोंडातून दिले पाहिजे आणि ३६–४८ तासांनंतर मिसोप्रोस्टॉल २०० एमसीजीच्या ४ गोळ्या योनीतून, तोंडाने; जिभेखाली किंवा गालात (चघळायला) दिल्या पाहिजेत. सेवा प्रदात्याच्या प्रिस्क्रिप्शनच्या सादरीकरणावर औषधे उपलब्ध असावीत आणि औषधे वैद्यकीय देखरेखीखाली देण्यात यावी.
- शस्त्रक्रिया: गर्भधारणेच्या ७ ते १५ आठवड्यांमध्ये मॅन्युअल व्हॅक्यूम ऍस्पिरेशन किंवा एमव्हीए करण्यात यावे . १५ ते २० आठवड्यांच्या गर्भधारणे साठी, भूल देऊन डिलेटेशन (उ्ब्ळश्ररींरींळेप) आणि इलेक्ट्रिक एव्हॅक्युएशन किंवा ईव्हीए करण्यात यावे.

## गर्भपात कायद्याची टाइमलाइन

| | |
|---|---|
| १९७१ पर्यंत | महिलेचे प्राण वाचवण्याशिवाय अन्य कारणासाठी गर्भपात भारतीय दंड संहितेनुसार (आयपीसी) कलम ३१२ अन्वये गुन्हा होता |
| १९६४ | आरोग्य आणि कुटुंब नियोजन मंत्रालयाद्वारे शांतीलाल शाह समितीची स्थापना केली गेली |
| १९६६ | शांतीलाल शहा समिती अहवाल सादर केला गेला |
| १९७० | शांतीलाल शाह समितीच्या शिफारशी स्वीकारल्या आणि संसदेत विधेयक म्हणून सादर केल्या गेल्या |
| १९७१ | मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी (एमटीपी) विधेयक संसदेने मंजूर केले |
| १९७२ | एमटीपी कायदा जम्मू आणि काश्मीर वगळता सर्व राज्यांमध्ये लागू केला गेला. आयपीसी कलम ३१२ ला एमटीपी कायदा अपवाद आहे |
| १९७५ | एमटीपी अधिनियम तयार केले गेले |
| २००२ | एमटीपी कायद्यात सुधारणा करून खाजगी जागेसाठी मान्यता प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यात आले, 'वेडा' हा शब्द बदली करून 'मानसिकदृष्ट्या आजारी व्यक्ती' हा शब्द वापरला गेला आणि कायद्याचे पालन न केल्यास अधिक कठोर दंड लागू केले |

| | |
|---|---|
| २००३ | एमटीपी अधिनियमांमध्ये सुधारणा , जिल्हा स्तरीय समितीची रचना आणि कार्यकाळ निश्चित करण्यात आला,<br><br>मंजूर केंद्रांसाठी पायाभूत सुविधा मार्गदर्शक तत्त्वे, तपासणी आणि रद्द करण्याची प्रक्रिया परिभाषित करण्यात आली |
| २०१४ | आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सार्वजनिक क्षेत्रामध्ये एमटीपी सुधारणा विधेयक, २०१४ सामायिक केले.<br><br>प्रस्तावित सुधारणांमध्ये प्रदात्यांमध्ये विस्तार आणि कायदेशीर एमटीपीसाठी गर्भधारणेच्या वरच्या मर्यादेत वाढ आणि एमटीपी कायद्यात स्पष्टता समाविष्ट होती. |
| २०१६ | एमटीपी सुधारणा विधेयक, २०१६ चा मसुदा तयार करण्यात आला. प्रस्तावित सुधारणांमध्ये कायदेशीर एमटीपीसाठी गर्भधारणेच्या वरच्या मर्यादेत वाढ आणि बलात्कार आणि अनाचार पीडित, अविवाहित आणि अपंग महिलांना सुधारित कायदेशीर उपलब्धता मिळवून देणे, यांचा समावेश होता. |
| २०२१ | मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी (सुधारणा) ॲक्ट, २०२१ संसदेने मंजूर केला. नियम तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. |

■ ■ ■

**SAHAJ on behalf of CommonHealth**

SAHAJ, 1 Shri Hari Apartments, 13 Anandnagar Society,
Behind Express Hotel, Alkapuri, Vadodara, Gujarat, India 390007
Tel: 91-265-2342539 • Email: sahaj_sm2006@yahoo.co.in
Website: www.sahaj.org.in

Contact: Swati Shinde [Coordinator CommonHealth] • Email : cmnhsa@gmail.com
CommonHealth website: http://www.commonhealth.in

arrow CommonHealth rfsu